# प्रेसनोट

**खडक पोलीस स्टेशन येथील कुरीअरवाल्यावर भरदिवसा टाकलेल्या दरोडयातील आरोपी व गुन्हयातील वापरलेली कार व रोख रकमेसह दोन आरोपी युनिट ४,गुन्हे शाखेच्या पोलीसांनी २४ तासाच्या आत पकडले**

---

दि.१८/०६/२०१९ रोजी खडक पोलीस स्टेशन हददीत येथे सायंकाळी ०५.०० वा चे सुमारास येथे यातील कुरिअर व्यावसाईक फिर्यादी मार्केटयार्ड येथून सेव्हन लव्हज चौकाजवळ, शंकरशेट रोड मार्गे स्वारगेटकडे त्यांचे ॲक्टिव्हावरून जात असताना काही अज्ञात इसम एका चारचाकी वाहनामध्ये येवून फिर्यादीस अडवून ॲक्टिव्हा गाडीच्या डिकीतून रु.५,००,०००/- रोख रक्कम चोरुन नेले बाबत खडक पोलीस स्टेशन येथे गुरनं २६१/२०१९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मा. अपर पोलीस आयुक्त श्री अशोक मोराळे यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास करण्याचा आदेश गुन्हे शाखेच्या सर्व युनिटसला दिले होते. त्यानुसार मा. पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील सर्व युनिट समांतर तपास करीत होते.

युनिट -०४,गुन्हे शाखा चे कर्मचारी सुनिल पवार यांना मिळालेल्या बातमीनुसार तसेच पोलीस कर्मचारी सचिन ढवळे, विशाल शिर्के यांना आरोपी **शाम राजू शिंदे, वय ३१ वर्षे, रा. स नं ५४/२, अरणेश्वर,अण्णाभाऊ साठे नगर, पुणे** हा लोणावळा येथे असल्याबाबत खात्रीशिर माहिती मिळाली होती. तसेच त्याचेकडे गुन्हयात वापरलेली हुंडाई आय १०, गाडी क्र. एम एच १२/ क्यु वाय/५५०९ ही घेवून तो महाराष्ट्राबाहेर जाणार आहे. तो रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून, त्याचेविरुध्द दत्तवाडी, सहकारनगर,येरवडा, पो स्टे येथे गुन्हे दाखल आहेत. त्यानुसार नमुद पथकाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली त्वरीत हालचाल करुन आरोपी पळून जाण्याचे तयारीत असताना लोणावळा येथे सापळा रचून ताब्यात घेतले. त्याचे चौकशीमध्ये त्याचे सोबतचा एक साथीदार आकाश जाधवचे ठावठिकाण्याबाबत माहिती समजली व गुन्हयातील काही रक्कम त्याचेकडे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार **आकाश प्रविण जाधव,वय २४ वर्षे, रा स नं १५४/२,प्लॉट नं २, माजी सैनिक नगर, येरवडा,पुणे** यास विश्रांतवाडी परिसरातून ताब्यात घेतले. त्याचेकडून नमुद गुन्हयातील रोख रक्कम ४,१९,५००/- असा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. यातील आरोपींकडून एक हुंडाई आय १०, गाडी क्र. एम एच १२/ क्यु वाय/५५०९, रोख रुपये ४,१९,५००/-, मोबाईल असा माल जप्त करण्यात आला आहे. वरील दोन्ही आरोपी पुढील तपासकामी खडक पोलीस स्टेशन,पुणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

तसेच सदर दाखल गुन्हयातील बालाजी मसुरे व दिपक गायकवाड हे युनिट १,गुन्हे शाखा,पुणे यांनी पकडले असून,पुढील तपासकामी खडक पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त श्री अशोक मोराळे, मा पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे, सहा पोलीस आयुक्त श्री भानुप्रताप बर्गे, पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक निलेशकुमार महाडिक, पोलीस कर्मचारी सुनिल पवार, सचिन ढवळे, विशाल शिर्के, शंकर पाटील, गणेश काळे, अशोक शेलार यांनी केली आहे.

## प्रेसनोट दि.२१/०६/२०१९

**भरदिवसा मनी ट्रान्सफरचे पैसे लुटणा-या २ आरोपींना गुन्हे शाखा,युनिट-०४ च्या पथकाने केली अटक.**

दि.१४/०६/२०१९ रोजी येरवडा पोलीस स्टेशन हद्दीत पर्णकुटी चौकाजवळ फिर्यादी नामे सुधाकर तात्याराव क्षिरसागर,रा.स.नं-९०,आदर्श इंदिरा नगर,आळंदी रोड,येरवडा हे एका कंपनीची कलेक्शनची रोख रक्कम रुपये -३ लाख रुपये घेवून मोटर सायकलने जात असताना दुपारी १२/४० वा.सुमारास ०४ अनोळखी इसमांनी त्यांची मोटर सायकल अडवून डोक्यावर कोयत्याने वार करून त्याचे ताब्यातील रोख रक्कम असलेली सॅक बॅग चोरुन नेली.या गुन्हयाचा तपास येरवडा पोलीस स्टेशन अधिकारी कर्मचारी सह गुन्हे शाखा युनिट-०४ हे संयुक्तरित्या करीत होते.तपासामध्ये आरोपीत इसमाने फिर्यादीचा गोल्फ चौकातून रिक्षाने पाठलाग करून नंतर रिक्षा मोटर सायकलला ओव्हरटेक करून अगोदरच पुढे जावून थांबून गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले होते.आरोपी हे गुन्हा केल्यानंतर पोलिसांची दिशाभूल करण्याकरिता वेगवेगळया मार्गाने पळून गेलेले होते.

गुन्हे शाखा युनिट-०४ चे कर्मचारी यातील नगररोडकडून इराणी मार्केट दिशेने चोरीस गेलेले बॅगसह पळून गेलेल्या दोन इसमांचा शोध घेत असताना **सी सी टी व्ही फुटेजचे** आधारे अशी माहिती मिळाली की,सदरचे आरोपी हे २ नसून जास्त आहेत,ते पुढे मोटर सायकल घेवून थांबलेल्या २ इसमांच्या गाडीवर बसून लक्ष्मीनगर दिशेने पळून गेलेले आहे.-त्यांचा सी सी टी व्ही चे आधारे माग काढत असताना असे निष्पन्न झाले की,सदर गाडीचा वापर करून जाणा-या इसमांची नावे – १) विशाल कैलास बाणेकर,वय-२३ वर्षे,रा.समता मित्रमंडळाजवळ,लक्ष्मीनगर,येरवडा २) आकाश वसंत कंचीले,वय-१९ वर्षे,रा.फिरदोस मस्जिद जवळ,लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे अशी आहे,परंतु गुन्हा घडल्यानंतर ते सर्व सदर परिसरात न थांबता बाहेर निघून गेलेले आहे.

सदर आरोपींचा शोध घेत असताना दि.१८/०६/२०१९ रोजी पोलीस नाईक सुरेंद्र साबळे व पोलीस शिपाई सागर घोरपडे यांना दाखल गुन्हयातील आरोपी विशाल बाणेकर व आकाश कंचीले हे सादलबाबा दर्ग्याजवळ येणार असलेची बातमीदारामार्फत माहिती मिळाली असता त्यांचेवर नजर ठेवून त्यांना पकडण्यात आले आहे.

आरोपीत इसमांचे चौकशीमध्ये असे समजले की फिर्यादी हे गोल्फ क्लब चौकामध्ये एका दुकानातील कलेक्ट केलेली रक्कम मोजून बॅगेत ठेवत असताना यातील मुख्य आरोपी विशाल बाणेकर याने पाहिले होते व त्याने व त्याचे इतर साथीदारांचे मदतीने कट रचून सदरची जबरी चोरी केलेली आहे.त्यावेळी त्याने आकाश कंचीले व इतर ०५ साथीदारांची मदत घेतली होती,त्यांना यापूर्वी यरेवडा पोलीसांनी अटक केलेली होती,परंतु कटाचा मुख्य सूत्रधार विशाल बाणेकर हा फरार होता.सदरचा गुन्हा केल्यानंतर वेगवेगळया मार्गाने पुन्हा एकत्र येवून चोरीच्या हिश्याची रक्कम आपापसात वाटणी करून पुन्हा वेगवेगळया ठिकाणी निघून गेलेले होते.

अटक केलेल्या आरोपीचे चौकशीमध्ये असे निष्पन्न झाले की,१० वी व १२ वी शिक्षण झाल्यानंतर त्यांनी शाळा सोडलेली असून सध्या ते काहीएक कामधंदा करीत नसून बेरोजगार आहे व संगतीवंगतीने त्यांनी चैनीसाठी सदरची जबरी चोरी केलेली असून चोरी केलेल्या पैशामधून आरोपींनी मॉलमधून कपडे खरेदी करण्यासाठी व मौजमजेसाठी खर्च केलेले आहे.यातील आरोपी विशाल बाणेकर हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्यास यापुर्वी येरवडा पोस्टे हद्दीतुन तडीपार करण्यात आलेले होते, सध्या त्याची तडीपारीची मुदत संपलेली आहे.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.अशोक मोराळे,मा.पोलीस उपआयुक्त,गुन्हे श्री.शिरीष सरदेशपांडे,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री भानुदास बर्गे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री अंजुम बागवान,पोलीस उपनिरीक्षक श्री विजय झंजाड,कर्मचारी करीम सय्यद,शंकर पाटील,सुरेंद्र साबळे,सागर घोरपडे,सचिन ढवळे,अशोक शेलार,राकेश खुणवे,जितेंद्र तुपे,गणेश साळुंके यांचे पथकाने केली.